जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा

निविदा सूचना

क्रमांक/संगणक/१३९६ /२०२६. दिनांक: १६ /०४/२०२६

माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांचे दिनांक १७/०४/२०२६ चे आदेशान्वये जिल्हा न्यायालय, भंडारा व अधिनस्थ/तालूका न्यायालय येथील खालील नमूद एकूण ९८ प्रिंटर चा **एक वर्षाकरिता** गैरव्यापक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करार Non-Comprehensive Annual Maintenance Contract करण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहेत. करिता इच्छूकांनी त्यांची सिलबंद/मोहोरबंद निविदा प्रपत्र क्रमांक १ तसेच नमूद अटी व शर्तीसह दिनांक २७/०४/२०२६ ला सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत जिल्हा न्यायालय, भंडारा येथे सादर करावे.

तद्नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

जिल्हा न्यायालय, भंडारा व अधिनस्थ/तालूका न्यायालयात गैरव्यापक वार्षिक देखभाल-दुरूस्ती करार करण्याकरिता उपलब्ध असलेल्या प्रिंटरची संख्या दर्शविणारा तक्ता.

Sr. No.	Court Name	Canon LBP 151 dw	HP Laser Jet M202 dw	HP Laser Jet P1606dn	Kyocera m2040dn
1.	District Court, **Bhandara**	25	08	06	15
2.	Civil and Criminal Court, **Tumsar**	02	01	00	03
3.	Civil and Criminal Court, **Mohadi**	03	00	00	02
4.	Civil and Criminal Court, **Pauni**	08	00	00	04
5.	Civil and Criminal Court, **Sakoli**	08	00	00	02
6.	Civil and Criminal Court, **Lakhani**	01	00	02	02
7.	Civil and Criminal Court, **Lakhandur**	02	02	00	02
Model Wise Printers Quantity		**49**	**11**	**8**	**30**
Total Quantity.: 98					

प्रपत्र क्रमांक १

Sr. No.	Particulars	(For Canon LBP 151 dw Printer) Rate Per Nos. /Per Unit/ (Including GST)	(For Kyocera m2040dn Printer) Rate Per Nos. /Per Unit/ (Including GST)	(For HP Laser Jet M202 dw Printer) Rate Per Nos. /Per Unit/ (Including GST)	(For HP Laser Jet P1606 dn Printer) Rate Per Nos. /Per Unit/ (Including GST)
1	Fuser Unit / Fuser Assembly				
2	Teflon Sleeve				
3	Pressure Roller				
4	Solenoid				
5	Printer Complete Gear Assembly				
6	Logic Card				
7	Power Supply				
8	Laser Unit (LSU)				
9	Main Motor				
10	Paper Pick-up Roller				
11	Control Panel				
12	Exhaust Fan (Fuser exhaust / Exhaust fan)				
13	Power Supply Repairing				
14	Fuser Drive Gear				
15	Motor Drive Gear				
16	Toner Drive Lever				
17	Toner Drive Gear				
18	Clutch Gear				
19	Pick-up Assembly				
20	LSU Cable				
21	Power to Logic Cable				
22	Motor Drive Belt				

23	Engine Circuit				
24	Paper Input Tray				
25	Paper Output Tray				
26	Fuser Hinges				
27	Oil Application Pad with Cloth Assembly				
28	Drum Unit				
29	Developer Unit				
30	Pick-up Roller with Bush				
31	ADF Hinges Set				
32	HVT (High Voltage Board)				
33	CCD Unit				
34	ADF Pick-up Roller				
35	Paper Sensor with Circuit				
36	CCD Cable				
37	CCD Motor				
38	USB Printer Cable (1.5 Mtr.)				
39	Power Cable				
40	Servicing Charges				
41	Visiting Charges				

प्रिंटर देखभाल–दुरूस्तीबाबत अटी व शर्तीः

१.	सदर करार जिल्हा न्यायालय, भंडारा व अधिनस्थ तुमसर, मोहाडी, पवनी, साकोली, लाखणी व लाखांदूर या तालूका न्यायालयातील एकूण ९८ प्रिंटर्स करिता राहील. प्रिंटर मध्ये बिघाड आल्यास ते दुरूस्तीकरिता संबंधित कंपनी/निविदाधारक यांना प्रिंटर ज्या न्यायालयात आहे त्या न्यायालयात स्वतः जावून प्रिंटर दुरूस्ती करावा लागेल.
२.	सदर करार गैरव्यापक वार्षिक देखभाल–दुरूस्ती (Non–Comprehensive Annual Maintenance Contract) पध्दतीचा राहील. केवळ बिघाड आलेल्या प्रिंटरला दुरूस्ती करण्याकरिता आलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती कार्यालय करेल. प्रिंटरमध्ये बिघाड आल्यानंतर त्याला दुरूस्तीकरिता आवश्यक संबंधित सर्व सुटे भाग दुरूस्ती किंवा ते नवीन लावावयाचे असल्यास प्रपत्र क्रमांक १ मध्ये नमूद दरपत्रकानुसार लावून द्यावे लागतील.
३.	निविदेमध्ये नमूद करण्यात आलेले दर सर्व कर आणि इतर शुल्कासहित आहेत असे गृहीत धरण्यात येईल.
४.	निविदा सादर करताना त्यासह कंपनीचा नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, आयकर प्रमाणपत्र (मागील ०१ वर्षाचे), नजीकच्या काळात प्रिंटरशी संबंधित शासकीय/निमशासकीय कार्यालये यांचेसोबत करार केलेल्या वार्षिक देखभाल–दुरूस्ती (कमीत कमी ०१) इ. कागदपत्रांच्या स्वयंःप्रमाणित छायाप्रत सादर करणे बंधनकारक राहील.
५.	करार झाल्यावर कंपनी/निविदाधारकास तक्रार दाखल करण्याकरिता एक ई–मेल आयडी व एक मोबाईल/दूरध्वनी क्रमांक देणे बंधनकारक राहील. ज्यावर जिल्हा न्यायालय, भंडारा व तालूका न्यायालयातील संबंधित कर्मचारी यांचेद्वारे तक्रार नोंदविले जातील.
६.	प्रिंटर दुरूस्तीकरिता ई–मेल किंवा मोबाईल/दूरध्वनी संदेशाद्वारे तक्रार दाखल केली असता कंपनी/निविदाधारक यांना जिल्हा न्यायालय, भंडारा येथील तक्रार ०२ दिवसाचे आत व तालूका न्यायालयातील तक्रार ०३ दिवसाचे आत दुरूस्ती करून द्यावी लागेल. असामान्य परिस्थितीत एखादे प्रिंटर दुरूस्ती होत नसल्यास किंवा त्याचे सुटे भाग उपलब्ध होत नसल्यास त्याचे वैध कारण सर्व्हीस रिपोर्ट मध्ये नमूद करणे बंधनकारक राहील. वैध कारण लक्षात घेऊन अशा दुरूस्तीकरिता जास्तीत जास्त एक आठवडा इतका कालावधी देण्यात येईल.
७.	तक्रार दाखल केलेले प्रिंटर उपरोक्त दिलेल्या कालावधीत दुरूस्ती न केल्यास प्रति दिवस रूपये १००/– अक्षरी शंभर रूपये फक्त (प्रति तक्रार) इतका दंड आकारण्यात येईल व सदरचा दंड संबंधित कंपनी/निविदाधारक यांना देय/प्रलंबित असलेल्या देयकामधून वजा करण्यात येईल. तक्रार दाखल केल्यानंतर सुध्दा प्रिंटर स्तंभ क्रमांक ०६ मध्ये दिलेल्या वेळेत दुरूस्ती करून न दिल्यास न्यायालय स्थानिक बाजारातून प्रिंटर दुरूस्ती करेल व त्याबाबत येणारा खर्च कंपनी/निविदाधारक यांना देय रकमेतून वजा करण्यात येईल.
८.	निविदा मंजूर झालेल्या कंपनी/निविदाधारक यांना रूपये ५००/– अक्षरी पाचशे रूपयाचे स्टॅम्प पेपरवर आपला करार लिहून द्यावा लागेल व सदरहू स्टॅम्प पेपर करिता आलेला खर्च कंपनीला/निविदाधारकास सोसावा लागेल. तसेच अनामत रक्कम म्हणून एकूण रूपये १०,०००/– अक्षरी रूपये दहा हजार फक्त या कार्यालयास जमा करणे बंधनकारक राहील. करार संपल्यानंतर सदरची अनामत रक्कम कंपनी/निविदाधारकास परत करण्यात येईल.
९.	कोणत्याही परिस्थितीत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. देयक हे द्विप्रतीत संपूर्ण तपशिलासह या कार्यालयास सादर करावे लागेल. देयक हे त्रैमासिक पध्दतीने त्रैमासिक संपल्यानंतर सादर केल्यावर नियमानूसार अदा करण्यात येईल. प्रत्येक त्रिमाही कालावधीत केवळ बिघाड आलेल्या व त्यांना दुरूस्ती करण्यात आलेल्या प्रिंटर करिताच देयके अदा करण्यात येतील. नियमांनुसार लागू होणारे कर/शुल्क/दंड कपात करण्यात येईल.
१०.	सदर निविदा सूचनेमधील नमूद प्रिंटरच्या संख्येत कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी वाढ किंवा कमी अथवा संपूर्णतः वगळण्याचे अधिकार किंवा त्यामध्ये इतर हार्डवेअर समाविष्ट करण्याचा अधिकार माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहे.
११.	कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहे.
१२.	सदर करार हा मंजूर झालेल्या दिनांकापासून ते पूढील एक वर्षाकरिता वैध राहील. परंतु कार्यालयास वाटल्यास तो कोणत्याही क्षणी, कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

टिप: १. निविदा सादर करतांना लिफाफ्याच्या पृष्ठभागावर "प्रिंटर दुरूस्तीकरिता गैरव्यापक वार्षिक देखभाल व दुरूस्ती बाबतची निविदा" असा स्पष्ट उल्लेख करावा.

२. निविदा उपरोक्त दिलेल्या प्रपत्र क्रमांक १ मध्येच सादर करावे. त्यात कोणताही बदल करू नये.

३. उपरोक्त वस्तूंच्या यादीपैकी एखादी वस्तू Kyocera Printer करिता आवश्यक आहे परंतु Canon व HP Printer करिता तिचा उपयोग नाही तर अशावेळी केवळ Kyocera Printer च्या नावाखाली त्या वस्तूचे कमीत कमी दर नमूद करावे व उरलेल्या प्रिंटर्स च्या नावाखाली Not Applicable (NA) असा स्पष्ट उल्लेख करावा.

४. निविदा सादर करतांना उपरोक्त नमूद अनु क्रमांक १ ते १२ मधील अटी व शर्ती मान्य असल्याचे स्पष्ट नमूद करावे.

५. निविदा सादर करतांना अटी व शर्तीमधील अनु. क्र. ४ मधील आवश्यक कागदपत्रे (स्वसाक्षांकित प्रत) निविदेसह न चुकता सादर करावे. अन्यथा निविदांचा विचार केला जाणार नाही व त्या रद्द करण्यात येतील.

आदेशान्वये,

(एस. एम. निनावे)
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, भंडारा